
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUN 2018
तरुण भारत




# विद्यापीठात उद्यापासून प्रवेश प्रक्रिया सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत एम. ए., एम. कॉम., एल. एल. एम., एम. एस्सी. टेक., गणित आदी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. बुधवार (ता. २७) पासून सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रुटी आहेत, त्यांना एसएमएसव्दारे आज (ता. २६) अधिविभागात बोलावले आहे. शिवाजी विद्यापीठाने पूर्वी २१ जूनपासून प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ होणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र बी. एस्सी. तृतीय वर्षातील काही विद्यार्थ्यांचे निकाल प्रलंबित असल्याने ही प्रवेश प्रक्रिया रद्द करीत, नव्याने प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक **www.unishivaji.ac.in"Admissin2018"** या लींकवर जाहीर केले आहे. त्यामुळे बुधवारपासून एम. एस्सी. प्रथम वर्षाच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत नॅनो सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजीची प्रवेशपूर्व ऑनलाईन परीक्षा सोमवारी चार केंद्रांवर सुरळीत पार पडली. या परीक्षेसाठी ४२१ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी २५७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर १६४ विद्यार्थी गैरहजर होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
26 JUN 2018
सकाळ

# २५७ विद्यार्थ्यांनी दिली ऑनलाईन परीक्षा




**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील बी. एस्सी., एम. एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीकरिता २५७ विद्यार्थ्यांनी आज ऑनलाईन परीक्षा दिली. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (कसबा बावडा), कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (केआयटी), जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड पॉलिटेक्निकमध्ये परीक्षा केंद्रे होती. परीक्षेकरिता ४२१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. पैकी १६४ विद्यार्थी परीक्षेसाठी अनुपस्थित राहिले.


26 JUN 2018 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीरांचे तत्त्वज्ञान शिकण्याची संधी

**महेश कांबळे,**
सीसीआर, शिवाजी विद्यापीठ





भगवान महावीरांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी शिवाजी विद्यापीठामध्ये गेल्या दहा वर्षांपासून महावीर अध्यासन केंद्र कार्यरत आहे. या तत्वज्ञानाचा फायदा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही व्हावा या उदात्त हेतूने महावीर अध्यासनाची स्थापना करण्यात आली. जगाला सत्य, अहिंसा, शांती याची बहुमोल तत्त्वे देणाऱ्या भगवान महावीर यांच्या तत्वज्ञानाचे अध्यासन करण्यासाठी तरुणाईचा कल दिसून येत आहे. निसर्ग नियमाप्रमाणे चालणारे चक्र, निसर्गामुळे असणारी संतुलन स्थिती, जागतिक स्थितीवर असणारे हिंसेचे साम्राज्य या सर्वांवर भगवान महावीर यांचा शांतीचा संदेश प्रभावी ठरत आहे यामुळे जैन तत्वज्ञानाचा वैचारिक वारसा जपण्यासाठी या केंद्राची आवश्यकता अधोरेखित होत आहे.

शास्त्रीय निकषांवर आधारित या अध्यासनाकडून सध्या एक वर्ष कालावधीचा पदवी प्रमाणपत्र कोर्से व जैनालॉजी आणि प्रक्रित अभ्रासक्रम उपलब्ध असून पदवी संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांनसाठी या अध्यासन केंद्रामार्फत प्रवेश दिला जातो, गुणवत्तायादी आणि मुलाखत या प्रक्रियांमधून ५० विद्यार्थ्यांची अंतिम यादी जाहीर केली जाते, महावीर अध्यासनामार्फत संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक प्राधान्यक्रम दिला जातो, जैन तत्वज्ञानांवर आधारित आंतरराष्ट्रीय परिषद, चर्चासत्र, व्याख्याने, ग्रंथांच्या स्वरूपातील लिखित साहित्य प्रदर्शन आयोजित केले जाते जेणेकरून विद्यार्थ्यांना याचा अधिक फायदा व्हावा हा हेतू समोर ठेवून या परिषदांचे आयोजन केले जाते. २०११ च्या जनगणनेच्या आधारे भारतातील सर्वात अधिक साक्षर किंबहुना शिक्षणाच्या बाबतीत अधिक परिपकव समाज म्हणून जैन समाजाचे अस्तित्व जाणवते, यामध्ये स्त्रियांच्या शिक्षणावर असणारा अधिक भर, जैन समाज तत्वज्ञानाचे सामाजिक अंगाने केलेले मूल्यांकन मार्मिक स्वरूपाचे आहे. या अध्यासन केंद्राकडून कोल्हापूर जिल्हा व परिसरातील घनकचरा प्रकल्प, मोठी धरणे, रस्त्यांचा दर्जा बाबतीतील थर्ड पार्टी मूल्यांकन केले जाते, तसेच भगवान महावीर यांच्या तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यामध्ये मुलींचे प्रमाण लक्षणीय आहे. शिवाजी विद्यापीठामधील शैक्षणिक वातावरणाच्या कक्षा रुंदावण्यासाठी तत्वज्ञान अध्यासन केंद्रे उपयोगी ठरत आहेत. अध्यासनाच्या विद्यार्थ्यांसाठी अधिक- अधिक आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे, कार्यशाळा, संशोधनासाठी ग्रंथ तसेच आर्थिक साक्षरता वाढीसाठी प्रयत्न, शैक्षणिक कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्याचा अध्यासन केंद्राचा मानस आहे.

**“ आजच्या परिस्थितीमध्ये माणसाकडे सत्य, अहिंसा, प्रामाणिकपणा ही मानवी मूल्ये असणे काळाची गरज असून भगवान महावीर यांच्या तत्वज्ञानामधून याचा अभ्यास करण्याची नामी संधी अध्यासन केंद्रामार्फत उपलब्ध करून देण्यात आली आहे, खासकरून स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.**

**– प्रा. व्ही. बी. ककडे,**
भगवान महावीर अध्यासन केंद्र

'26 JUN 2018 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'राजर्षी शाहू' विचार कार्याचा वारसा जपणारे पाईक

## राजर्षी शाहू जयंतीनिमित्त सातत्य जपणाऱ्या व्यक्ती व संस्थांवर प्रकाशझोत



**राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या ४८ वर्षांच्या अल्पायुष्यात विविध क्षेत्रात भरीव कार्य केल्यामुळेच आज कोल्हापूरने आपली जगभर वेगळी ओळख निर्माण केली आहे. अशा या लोकराजाचे कोल्हापुरात आंतरराष्ट्रीय स्मारक करण्याची घोषणा कागदावरच आहे. तसेच त्यांची समाधी बांधण्याचे काम सहा वर्षे झाली तरी पूर्ण झालेली नाही. यावरून लोकप्रतिनिधींची अनास्था दिसून येते. शाहू महाराजांची आज (मंगळवारी) जयंती. यानिमित्त घेतलेला आढावा...**

कोल्हापूर : सागर यादव

'हिरे माणके-सोने उधळा जय-जयकार करा, जय राजर्षी शाहू राजा तुजला हा मुजरा...' केवळ अशा शब्दातच कोल्हापूरनगरीचे भाग्यविधाते लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे वर्णन होऊ शकते. राजर्षी छत्रपती शाहूंचे विचार व त्यांच्या कार्याचा वारसा भावी पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी 'शाहू' विचारांचे अनेक अनुयायी व्यक्ती-संस्था-संघटना सक्रिय आहेत. वर्षातून जयंती किंवा पुण्यतीथीपुरती शाहूंची आठवण न काढता वर्षभर शाहू कार्याचा जागर या लोकांकडून सुरू असतो. आज राजर्षी शाहू महाराज यांची जयंतीच्या निमित्ताने अशा शाहू कार्यावर टाकलेला हा प्रकाशझोत...

### राजर्षी शाहू संशोधन केंद्र

शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रातर्फे वर्षभर राजर्षी शाहूंच्या इतिहासाविषयी संशोधन कार्य सुरू असते. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक संशोधक डॉ. देविका पाटील व सचिन घोरपडे व सहकारी या विभागात सक्रिय आहेत. या केंद्रात राजर्षी शाहू महाराज यांच्या संदर्भातील वस्तू, कागदपत्रे, छायाचित्रे, पुस्तके यांचे जतन-संवर्धन-संरक्षण करण्यात आले आहे. केंद्रातर्फे 'राजर्षी शाहू पेपर्स' हा ९ खंडांचा इतिहास, लठ्ठेकृत शाहूचरित्र असे ग्रंथ प्रकाशित करण्यात आले आहेत. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राचे अखंड कार्य सुरू आहे. डॉ. जयसिंगराव पवार यांनी महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनीच्या माध्यमातूनही शाहू कार्याच्या प्रचार-प्रसाराचे कार्य अखंड सुरू ठेवले आहे. विविध परदेशी आणि प्रादेशिक भाषेतून शाहू चरित्राच्या निर्मितीचे अद्वितीय कार्य त्यांनी सुरू ठेवले आहे. यासाठी त्यांना शाहू महाराज, खा. संभाजीराजे व मालोजीराजे यांचे सहकार्य मिळत आहे.

### सह्याद्री इतिहास संशोधन केंद्र

सह्याद्री इतिहास संशोधन केंद्रातर्फे राजर्षी शाहूंनी केलेल्या कार्यावर सातत्याने अभ्यास व संशोधनाचे कार्य सुरू आहे. राजर्षी शाहूंच्या कार्याचा अप्रकाशीत इतिहास लोकांसमोर आणण्यासाठी या केंद्रातर्फे प्रयत्न केले जातात, विविध प्रकारची प्रदर्शनि, व्याख्याने असे उपक्रम आयोजित करून त्या माध्यमातून शाहू कार्याचा वारसा लोकांपर्यंत पोहोचविला जातो. यासाठी इतिहास संशोधक इंद्रजित सावंत, मोडी अभ्यासक अमित आडसुळे, उत्तम नलवडे, किरणसिंह चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते सक्रिय आहेत. त्यांच्या या कार्याला अ.भा. मराठा महासंघातर्फे जिल्हाध्यक्ष वसंत मुळीक, अवधूत पाटील अशा व्यक्ती-संस्थांचे सहकार्य मिळत आहे.

### मानवतावादी विचारांचे 'अग्निदिव्य'

शंभर वर्षांपूर्वी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक यांच्यातील वैचारिक संघर्ष लोकांपर्यंत पोहोचवून आजच्या बुद्धिजीवी पिढीला मानवतावादी विचाराबद्दल सजग करण्याच्या उद्देशाने 'अग्निदिव्य' या राजर्षी शाहूंवरील नाटकाची निर्मिती करण्यात आली आहे. लोकराजा राजर्षी छत्रपती शाहूप्रेमी विचार मंचच्या सहकार्याने काळम्मावाडी येथील श्री हनुमान तरुण मंडळातर्फे या नाटकाची निर्मिती करण्यात आली आहे. दोन अंकी नाटकाची निर्मिती सुनील माने यांची असून, लेखन अशोक पाटोळे यांनी तर दिग्दर्शन प्रकाश पाटील यांचे आहे. वर्षभर या नाटकाचे सादरीकरण ठिकठिकाणी करून त्या माध्यमातून शाहूंचा इतिहास नव्या पिढीसमोर मांडण्याचे कार्य हे लोक करत आहेत.

### मानसिंगचा मोटारसायकलवरून राज्यभर प्रवास

लोकराजा राजर्षी शाहूंनी केलेल्या कार्याची माहिती उद्याच्या देशाचे भविष्य असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने मानसिंग विष्णू पाटील (वय ३५) या युवकाने अनोखी मोहीम फत्ते केली आहे. सन २००६ ते २०११ या कालावधीत विदर्भ वगळून अवघ्या महाराष्ट्रभर मानसिंगने आपल्या मोटारसायकलवरून प्रवास केला. प्रा. डॉ. नानासाहेब साळुंखे लिखीत 'शाहूंच्या आठवणी' हा तब्बल २६० पानांचा ग्रंथ अवघ्या अल्प किमतीत त्याने उपलब्ध करून दिला आहे. आजपर्यंत या पुस्तकाच्या दीड लाख प्रती मानसिंगने वितरित केल्या आहेत.

### लोकराजा फोरम

राजर्षी शाहू कार्याचा वारसा जगभर पोहोचावा, या उद्देशाने कोल्हापुरातील समविचारी तरुणांनी एकत्रित येऊन 'लोकराजा फोरम' ही संस्था सुरू केली आहे. या माध्यमातून वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. सोशल मीडियावरून जनजागृती केली जाते. कलानगरी कोल्हापूरचा नावलौकीक जपण्याच्या उद्देशाने फोरमतर्फे चित्रमय शाहूचरित्राची निर्मिती करण्यात आली आहे.

### लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू प्रतिष्ठान

भावी पिढी सक्षम-निर्व्यसनी व्हावी, रांगड्या कुस्तीसारख्या मर्दानी खेळाचे जतन व्हावे, या उद्देशाने राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापुरातील पेठापेठात तालीम परंपरा निर्माण केली. या परंपरेचे संरक्षण व्हावे. तालीम संस्थांच्या वतीने शाहू कार्याचा प्रचार-प्रसार व्हावा यासाठीच्या जनजागृतीसाठी लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू प्रतिष्ठानची स्थापना करण्यात आली आहे. पै. बाबा महाडिक, हिंदुराव हुजरे-पाटील, राजू सावंत, संग्राम यादव व सहकारी यासाठी सक्रिय असतात.

### शाहूप्रेमी संस्था-संघटना

'शाहू चरित्रकार' डॉ. रमेश जाधव, माजी महापौर भिकशेठ पाटील, इतिहास अभ्यासक राम यादव, पुराभिलेखाधिकारी केशव जाधव, गणेशकुमार खोडके, डॉ. मंजुश्री पवार, शाहीर राजू राऊत, रंगराव पाटील, दिलीप सावंत, आझाद नायकवडी या व्यक्तींसह सह्याद्री प्रतिष्ठान, शिवराज्य मंच, सत्यशोधक समाज, शाहू वैदिक स्कूल, शाहू संगीत विद्यालय, कोल्हापूर जिल्हा शाहीर परिषद, शाहू फौंडेशन, शाहू ट्रस्ट, शाहू विचार परीक्षा उपक्रमाचे जावेद मुल्लाणी आदींनी शाहू कार्याचा लोकोपयोगी वारसा आपापल्या पद्धतीने अखंड जपला आहे.

26 JUN 2018
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शिक्षणाचा हक्क साकारणारे द्रष्टे राजर्षी

भाष्य



**मतीन महिबूब शेख**
राज्यशास्त्राचे अभ्यासक, कोल्हापूर

**महात्मा फुले यांच्या शिक्षण विचाराचे सूत्र राजर्षी शाहू महाराजांनी नेमके पकडले आणि विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेला गती दिली. 'शिक्षणाच्या हक्का'ची संकल्पना राबविणारे ते द्रष्टे राजे होते. राजर्षी शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या शिक्षणविषयक कार्याचे महत्त्व विशद करणारा लेख.**



चित्र: दीपक संकपाळ

महाराष्ट्राच्या पुरोगामी चळवळीत सामाजिक न्याय, समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून कोल्हापूर संस्थानाचे राजे शाहू महाराज यांचे नाव अग्रस्थानी येते. समाजातील जातिभेद नष्ट करून उपेक्षितांना मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य राजर्षी शाहू यांनी केले. सामाजिक, आर्थिक, कला, क्रीडा या सर्वच क्षेत्रांत राजर्षींचे अमूल्य योगदान राहिले आहे. शिक्षणाच्या संदर्भात त्यांनी केलेले कार्य विशेष महत्त्वाचे आहे. शंभर वर्षांपूर्वी त्यांनी शिक्षणाला जे महत्त्व दिले, शिक्षणाच्या हक्काची जी संकल्पना मांडली, ते एक ऐतिहासिक कार्य होय.

महात्मा फुलेंनी पुण्यात उपेक्षितांच्या मुला-मुलींसाठी शाळा काढल्या व मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा आग्रह ब्रिटिश सरकारच्या हंटर शिक्षण आयोगापुढे धरला ; पण ही शिक्षण विचारांची लाट पुढे क्षीण होत गेली. महात्मा फुले यांच्या याच शिक्षणविचारांचे सूत्र राजर्षी शाहू यांनी नेमके पकडले. शिक्षण ही समतेची गुरुकिल्ली असल्याने लोकांच्या उत्कर्षासाठी, त्याच्याकडे असलेल्या उपजत बुद्धीच्या प्रगतीसाठी आणि मनावरील संस्कारांसाठी राजर्षींना गावोगावी शिक्षणाचे लोण पोचवायचे होते. आपल्या संस्थानात प्रजेसाठी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे, या विषयावर शाहू महाराज १९१३पासून गांभीर्याने विचार करत होते. पुढे त्यांनी २१सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या शिक्षणाच्या कायद्याचा जाहीरनामा काढून प्रसिद्ध केला. शिक्षण हेच समाजपरिवर्तनाचे साधन असून शिक्षणाच्या माध्यमातून शोषणमुक्त समाजनिर्मितीचे ध्येय शाहू महाराजांपुढे होते. कोल्हापूर संस्थानातील सर्व प्रजाजन साक्षर होऊन आपली स्थिती ओळखून प्रगती साधण्यास समर्थ व्हावे, याकरिता सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा राजर्षींनी केला. केवळ शाळा काढून भागणारे नाही, त्या शाळांत पालकांनी मुलांना पाठविले पाहिजे, याचा त्यांचा आग्रह होता. पालकांना त्यांनी याबाबत सक्ती केली. मुलांना न पाठविणाऱ्यांवर दंड आकारला. पहिल्या नव्या सक्तीच्या शाळेची सुरवात चार मार्च १९१८ रोजी चिखली या गावी केली. या कायद्याची अंमलबजावणी कसोशीने केली गेली. संस्थानात सर्वसाधारण लोकसंख्या असणाऱ्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा सुरू करण्यात आल्या. शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणावरील खर्चासाठी विशेष तरतूद केली. शिक्षणाच्या इमारतीचा पाया मजबूत घालावा म्हणून राजर्षींनी प्राथमिक शिक्षणावर लक्ष केंद्रित केले; तसेच त्यांनी माध्यमिक आणि उच्च शिक्षणावर भर दिला. राजाराम हायस्कूल आणि राजाराम महाविद्यालयाकडे विशेष लक्ष दिले. सरकारी शाळेत शिवाशिव पाळू नये व सर्व जातिधर्माच्या विद्यार्थ्यांना एकत्र बसवावे, असा वटहुकूम काढला. ज्या शाळा या हुकमाचे पालन करणार नाहीत त्यांचे आर्थिक साह्य (ग्रांट) व इतर सवलती बंद करण्याची तंबी दिली. लोकशिक्षण हाच लोकशाहीचा पाया आहे, हे तत्त्व राजर्षींनी प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत पाळले, म्हणून प्रत्येक जातीने आपापल्या स्त्री-पुरुषांना चांगले शिक्षण दिले पाहिजे, यावर त्यांचा कटाक्ष होता. राजर्षींनी विविध जातिधर्माच्या मुला-मुलींसाठी वेगवेगळी वसतिगृहे व शाळा उभारल्या. मागासलेल्या जातीत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने महाराजांनी



राजर्षी शाहू महाराज

कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागासवर्गासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेतला. यातून अस्पृश्यतेचे उच्चाटन हे त्यांनी आपले जीवितकर्तव्य मानले.

मुलीच्या शिक्षणासाठी शाहू महाराज विशेष आग्रही होते. तत्कालीन वर्णव्यवस्थेने शूद्र आणि सर्व स्त्रिया यांना शिक्षणाचा अधिकार नाकारून त्यांच्यावर अन्याय केला; परंतु कोल्हापूर संस्थानाचा स्त्री शिक्षणविषयक दृष्टिकोन मुळातच पुरोगामी होता. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या मागासलेल्या जातीच्या प्रौढ स्त्रियांसाठी त्यांनी मोफत सोय आपल्या दरबारामार्फत केली. मुलींच्या उच्च शिक्षणाच्या बाबतीत उदार दृष्टी ठेवली. राजाराम महाविद्यालयात शिकणाऱ्या सर्व मुलींना त्यांनी मोफत शिक्षण दिले. त्यांनी उपेक्षित समाजातील अनेक होतकरू तरुणांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक साह्य दिले. कोल्हापूर संस्थानातच नव्हे तर संस्थानाबाहेरही राजर्षींनी विद्यार्थी व संस्था यांना सढळ हाताने देणग्या व शिष्यवृत्त्या दिल्या. विसाव्या शतकाच्या प्रथम दशकात महात्मा फुले यांच्या शिक्षण विचाराचे सूत्र राजर्षींनी पकडले. कोल्हापूर हे सत्यशोधक समाजाचे एक प्रभावी केंद्र करून महाराष्ट्रभर शिक्षणाची लाट उसळून देण्याचे काम राजर्षींनी केले. त्यामुळे कोल्हापुरातील वसतिगृह सुविधायुक्त शिक्षणासाठी महाराष्ट्रातील गोरगरीब आणि हुशार विद्यार्थी कोल्हापूरकडे धाव घेऊ लागले. जी स्थिती आजही कायम आहे. राजर्षींचा राज्यकारभार हा वंचित प्रजाकेंद्री होता. समकालीन परिस्थितीशी त्यांचे विचार व कार्य मार्गदर्शक व समाजहिताचे ठरतात. त्यांच्या सुधारणावादी शैक्षणिक व सामाजिक धोरणांना शंभर वर्षे होत आहेत. शाहूंनी महाराष्ट्रात वसतिगृह सुविधायुक्त शिक्षणाचा पाया रचला. सर्व जातिधर्माच्या मुलांसाठी शिक्षणाची, राहण्याची व जेवणाची सोय केली. सध्या या पद्धतीच्या शिक्षणाला पुन्हा उजाळा देण्याची गरज आहे. राजर्षींचा विचार घेऊन शिक्षणाच्या मूळ प्रवाहातून बाहेर पडलेल्या सध्याच्या वंचित घटकाला त्याच प्रवाहात आणण्याचा प्रयत्न व्हायला हवा. मुलींच्या शिक्षणाच्या बाबतीतला राजर्षींचा सुधारणावादी विचार प्रभावीपणे राबवण्याची गरज आहे. शाहूंनी आपल्या शैक्षणिक धोरणात सक्तीचे प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतून देण्यास महत्त्व दिले. सध्याचे धोरण हे मातृभाषेला दुय्यम स्थानी ठेवण्याचे आहे, त्यामुळे ज्ञानाचा मूळ आशय विद्यार्थ्यांना अवगत होत नाही.

सर्वसामान्य माणसाला घडविणारे, त्याला केंद्रस्थानी ठेवणारे शैक्षणिक धोरण राजर्षींनी आखले. त्यांनी आपल्या शैक्षणिक व सामाजिक धोरणातून जातिधर्मांमध्ये एकोपा घडवून आणण्याचे विशेष प्रयोग केले. धर्म, जातविरहित समाजबांधणीसाठी केलेले हे प्रयत्न आजच्या काळातील परिस्थिती पाहता विशेष महत्त्वाचे ठरतात. शाहू राजे हे सर्व समाजऐक्याचे प्रतीक आहेत. शिक्षणाच्या बाबतीत भाषा, प्रदेश, जात, धर्म आणि वंश यांच्या भिंतीच्या पलीकडे जाऊन राजर्षींनी अज्ञानात खितपत पडलेल्या समाजाला जागे केले. त्यास विकासाच्या दिशेने वाटचाल करण्यास समर्थ बनवण्याचे कार्य त्यांनी केले. या शैक्षणिक कार्याची प्रेरणा घेत पुढे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून ते डॉ. पंजाबराव देशमुखांपर्यंत अनेक शिक्षण प्रसारकांनी सर्व महाराष्ट्रात उपेक्षित समाजाला समर्थ बनविणारी शिक्षण चळवळ चालू ठेवली. सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्रांतीचे अग्रदूत म्हणून मान्यता पावलेले हे राजे आहेत. लोकशिक्षण हाच लोकशाहीचा पाया असून, जोपर्यंत सर्व समाजशिक्षणाने समृद्ध होत नाही, तोपर्यंत प्रतिनिधिक लोकशाहीची कल्पना अर्थशून्य आहे, असे राजर्षींचे मत होते. त्यांनी दाखविलेल्या वाटेने वाटचाल करणे हे आजही राज्यकर्त्या आणि धुरीण वर्गासमोरील आव्हान आहे.

(स)